शिल्पकार विकासाचा...
# देशदूत
इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | जळगाव | वर्ष २७ । अंक २०० । मंगळवार, दि. १५ जुलै २०२५ । पाने -८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर




## तीन राज्यांना मिळाले नवे राज्यपाल

**नवी दिल्ली ।** राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी तीन राज्यपालांच्या नियुक्त्या केल्या आहेत. हरयाणा, गोवा आणि लडाख या केंद्र शासित प्रदेशात नवीन नियुक्त्या करण्यात आल्या. प्रा. अशीम कुमार घोष, पुसपती अशोक अशोक गजपती राजू आणि कविंदर गुप्ता यांची राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राज्यपाल म्हणून नियुक्ती केली. कविंदर गुप्ता यांची नियुक्ती नायब राज्यपाल म्हणून करण्यात आली आहे. लडाखचे नायब राज्यपालबी.डी. मिश्रा यांचा राजीनामा स्वीकारला आहे. राष्ट्रपती भवनाने जारी केलेल्या निवेदनानुसार, प्रा. अशीम कुमार घोष यांची हरयाणाचे राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे. पुसपती अशोक गजपती राजू यांची गोव्याच्या राज्यपाल पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# पाटलांचं ठरलं! घोडं कुठं अडलं!!

## फडणवीसांनी दिली थेट सभागृहात जयंतरावांना भाजपाची ऑफर

**मुंबई ।** शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी पक्षाच्या प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळामध्ये सुरु आहे. मात्र पवारांच्या पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आजच पत्रकारांशी चर्चा करताना जयंत पाटलांनी राजीनामा दिला नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे जयंत पाटलांनी राजीनामा दिलाय की नाही, याबद्दल संभ्रमावस्था आहे. असे असतानाच जयंत पाटील हे भारतीय जनता पार्टीच्या वाटेवर असल्याची दबक्या आवाजात चर्चा सुरु आहे. त्यांचा प्रवेश देखील होणार असून मंत्रिमंडळात स्थान देतांना टॉपच्या पाच खात्यांपैकी एक मिळावे अशी त्यांची अपेक्षा आहे.याच ठिकाणी घोडे अडले अशीही चर्चा सुरु आहे.

त्यातच आज थेट विधानसभेच्या कामकाजादरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जयंत पाटलांना आता मोदींच्या योजना आवडू लागल्या आहेत असे म्हणत सूचक विधान केले आहे. ते ऐकून अनेकांच्या भुवया उंचावल्या.

जयंत पाटील यांनी विधानसभेत बोलताना, बांधकाम कामगार मंडळातर्फे महाराष्ट्रभर पेटी, भांडी वाटपाचा काम सुरु आहे. पंतप्रधान साहेब यांनी सांगीतल की प्रत्येकाच्या खात्यावर डीबीटी करा. असे असताना आपण ही योजना का सुरु ठेवली? मफतलाल हे कपडा बनवतात हे माहीत आहे. मात्र ते भांडी बनवतात हे माहीत नाही, असे म्हटले. या प्रश्नाला आकाश फुंडकर यांनी उत्तर दिले, मफतलाल या निविदेत अपात्र झालेत. २०२० मध्ये जयंत पाटील तुम्हीच या योजनेला मुदतवाढ दिली. आपण राबवलेली योजना आहे जी आम्ही चालवत आहोत, असे फुंडकर म्हणाले.



### फडणवीस नेमकं काय म्हणाले?

जयंत पाटलांचे हे विधान ऐकताच, मुख्यमंत्र्यांनी जागेवर उभे राहत, अलीकडे जयंत पाटील यांना मोदींच्या सर्व योजना आवडू लागल्यात. मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी तयार केली जाईल आणि जास्तीत जास्त पारदर्शक कारभार करू, असे म्हटले. जयंत पाटलांना मोदींच्या योजना आवडत असल्याचे फडणवीसांनी केलेले विधान ऐकून सभागृहात अनेकांच्या भुवया उंचावल्या. जयंत पाटील यांना लवकरच भाजपामध्ये प्रवेश दिला जाईल या दाव्याला हवा देणारे हे वाक्य असल्याचीही चर्चा आहे. फडणवीसांचे हे विधान जयंत पाटलांना अप्रत्यक्षपणे भाजपामध्ये येण्यासाठी दिलेला सूचक इशारा आहे की काय अशी चर्चाही आहे.

### चर्चा निराधार - जयंत पाटील

मी आजही राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचा प्रदेशाध्यक्ष आहे. भाजप प्रवेशासाठी मी भाजपला तशी विनंती केली नाही. त्यामुळे याबद्दल वावड्या उठवणे थांबवा, असा खुलासा करत जयंत पाटील यांनी सोमवारी भाजप प्रवेशाची चर्चा निराधार ठरवली.जयंत पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा दिला असून ते भाजपच्या वाटेवर असल्याची जोरदार चर्चा गेले दोन दिवस सुरू होती. अखेर स्वतः जयंत पाटील यांनी आज विधानभवन परिसरात प्रसार माध्यमांसमोर येऊन याबाबत स्पष्टता दिली. भारतीय जनता पक्षामध्ये प्रवेश करण्यासाठी कोणी मला विचारलेले नाही ना मी कुणाला विनंती केलेली आहे. मी आजही शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचा प्रदेशाध्यक्ष आहे. प्रदेशाध्यक्ष पदावर असलेल्या व्यक्ती बाबत एवढ्या वावड्या उठवणे योग्य नाही. मी कुठल्या पक्षात जाणार, नाही जाणार हे सगळं तुम्हीच ठरवायला लागले आहात. सूत्राच्या हवाल्याने बातम्या देता आहात. पण यात कोणतेही तथ्य नाही, असे पाटील यांनी सांगितले.

### अध्यक्षांनी काढला शाब्दिक चिमटा

यावरही जयंत पाटलांनी आक्षेप नोंदवताना, प्रशासन मंत्र्याला कधीच सांगत नाही हे अयोग्य आहे. ई-टेंडर प्रमाणे योग्य. तो निर्णय द्यावा असा मंडळाने आदेश दिला. माझ्या आधी ही योजना सुरु होती. मंडळाने निर्णय. घ्यावा असे आम्ही सांगितले, अशी आठवण करुन दिली. यावर विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी, जयंत पाटील साहेब तुम्ही सध्या तरी प्रश्न विचारू शकतात उत्तर इतक्यात तरी नाही देऊ शकत, असा शाब्दिक चिमटा काढला. यावर जयंत पाटलांनी आपला आक्षेप नोंदवताना, ठराविक लोकांना काम द्यायचे हे मागील अनेक दिवसापासून सुरु आहे. एजंटचा सुळसुळाट सुरु आहे, असे म्हटले.

## संपादकीय

### निवडीनंतरची जबाबदारी मोठी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या बारा किल्ल्यांचा जागतिक वारसा स्थळात समावेश झाल्याच्या आनंदाचे तरंग मराठी मुलखातील जनतेच्या मनात अजून काही काळ उमटतच राहातील. किल्ल्यांचा अभिमान मराठी जनतेच्या नसानसात भिनलेला आहेच. त्या आनंदाला या निवडीने भरते आणले. अर्थात अशा निवडीचे महत्व आहेच. त्यामुळे पर्यटनाला चालना मिळेल. त्यासाठी युनेस्कोचा निधीही प्राप्त होईल. असा संपन्न वारसा जतन करणे हे महाराष्ट्र सरकारचे कर्तव्यच आहे. प्रश्न आहे तो दृष्टिकोनाचा. पर्यटक मोठ्या संख्येने भेट देतील पण त्यांना हे गडकिल्ले कसे दिसतील? जे जातात त्यांचे अनुभव कसे असतात? या ऐतिहासिक वारशाची सद्यस्थिती आणि त्यांचे संवर्धन हा जुनाच मुद्दा आहे. अपवाद वगळता बहुसंख्य किल्ल्यांची दूरवस्था झाली आहे. तटबंदी ढासळली आहे. किल्ले इतिहासाचे साक्षीदार आहेत खरे पण त्याच्या पाऊलखुणा किती ठिकाणी शिल्लक आहेत? स्वराज्याची राजधानी रायगड ही त्याला अपवाद नाही. किल्ल्यांवरील अतिक्रमणे हा राजकीय मुद्दा बनला असला तरी ते वास्तव आहे हे सरकारही जाणून आहे. सरकारे बदलतात. सत्ताधारी येतात आणि जातात. पण गडकिल्ल्यांचे संवर्धन ही फक्त घोषणाच ठरते असे मत प्रामाणिक आणि किल्ल्यांचा खरा कळवळा असलेले गिर्यारोहक सातत्याने व्यक्त करतात. धांडोळा घेतला तर अशा कितीतरी घोषणा फक्त कागदोपत्री आढळतील. या मुद्यामुळे निवडणुकीचे राजकारण साधता येते हे तर त्याचे एक कारण नसेल? किल्ले सुस्थितीत आणले तर राजकारणाची दुकाने बंद होण्याची भीती राजकारण्यांना सतावत असावी का? दुरवस्थेला सरकार इतकेच हौशे-नवशे आणि गवशे पर्यटक देखील जबाबदार आहेत. बेफिकीर आणि बेजाबदार वृत्तीमुळे किल्ल्यांचा परिसर अस्वच्छ होतो. तो मद्य पार्ट्यांचे ठिकाण बनतो. पाण्याची टाकी प्रदूषित होतात. बांधकाम ढासळते. किल्ल्यांचा जीर्णोद्धार हा स्वतंत्र अभ्यासाचा आणि दीर्घकालीन धोरणाचा विषय आहे. युनेस्को जीर्णोद्धाराचे प्रशिक्षण देखील देणार आहे. अनेक सामाजिक संस्था या क्षेत्रात स्वयंस्फूर्त काम करतात. त्यांच्या कामाला शास्त्रोक्त दिशा मिळू शकेल. या सगळ्या कार्यपद्धतीत सरकार पान २ वर

## दुर्गसंपदा महाराष्ट्राच्या शौर्याचा वारसा-मुख्यमंत्री

**मुंबई ।** महाराष्ट्रातील रायगड, राजगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, साल्हेर, सिंधुदुर्ग, स्वर्णदुर्ग, विजयदुर्ग, खान्देरी हे ११ किल्ले आणि तामिळनाडूतील जिंजी असे एकूण १२ किल्ले जागतिक वारसा म्हणून घोषित करण्यात आले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी घडवलेली दुर्गसंपदा ही महाराष्ट्राच्या शौर्याचा आणि सांस्कृतिक वारसा आहे. या ऐतिहासिक किल्ल्यांचा युनोस्कोच्या जागतिक वारसा यादीत समावेश होणे ही संपूर्ण महाराष्ट्र आणि देशासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधानसभेत काढले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या १२ किल्ल्याना युनोस्कोचे मानांकन मिळाले आहे. या प्रकरणी फडणवीस यांनी आज विधानसभेत निवेदन केले. फडणवीस म्हणाले, भौगोलिक परिस्थितीचा उत्तम वापर करून किल्ले बांधणी, गनिमी काव्याला अनुकूल भूरचनेचा उत्तम वापर, वैशिष्ट्यपूर्ण दरवाजे, लष्करी रणनिती, गनिमी कावा याला पूरक ठरणारी डोंगरी किल्ल्यांची निर्मिती करण्यात आली. पूर्वीच्या राजांनी किल्ले महसूल विषयक नियंत्रणासाठी बांधले. मात्र शिवाजी महाराजांनी याचा वापर लोक कल्याणार्थ निर्माण झालेल्या स्वराज्य बांधणीसाठी केला. हा विचार युनेस्कोने अद्वितीय वैश्विक मूल्य म्हणून मान्य केला आहे. यावेळी फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विशेष आभार मानले.

पंतप्रधानांकडे देशातील वेगवेगळ्या भागातून ७ प्रस्ताव युनोस्कोमध्ये नामांकन होण्यासाठी गेले होते. त्यापैकी पंतप्रधानांनी निर्णय घेऊन छत्रपती शिवरायांचे किल्ले हेच जागतिक वारसा म्हणून नामांकन करायचे ठरविले. या संपूर्ण प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्वांचे फडणवीस यांनी आभार व्यक्त केले. सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत असणाऱ्या पुरातत्त्व वास्तूसंग्रालयाचे, संचालनालयाचे संचालक यांनी हा प्रस्ताव तयार केला.

## मोटारसायकलींच्या धडकेत दोन ठार

**धुळे ।** साक्री तालुक्यातील वाकी परिसरात दोन दुचाकींच्या समोरासमोर झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून, दोघे गंभीर जखमी झाले आहेत. भरधाव वेगातील युनिकॉर्न मोटारसायकलने समोरून येणाऱ्या स्प्लेंडरला जोरदार धडक दिल्याने हा अपघात घडला.

गोरख झिपरु चौधरी (वय २६, रा. वाकी, पो. पानखेडा, ता. साक्री) व संदिप रोहिदास ठाकरे (वय २९, रा. पुण्याचापाडा, पो. टेंभे प्र. वार्सा, ता. साक्री) अशी मयतांची नावे आहेत. तर अपघातात सुभाष महारु चौधरी (वय २७, रा. वाकी) आणि रविंद्र छोटीराम ठाकरे (वय १८, रा. पुण्याचापाडा, पो. टेंभे प्र. वार्सा) हे दोघे गंभीर जखमी झाले आहेत.

संदिप ठाकरे याने त्याच्या ताब्यातील युनिकॉर्न (क्र. एमएच १८ व्ही डब्ल्यू ३७७५) ही दुचाकी भरधाव वेगात व निष्काळजीपणे चालवित समोरून येणाऱ्या स्प्लेंडर (क्र. एमएच १० एएम ८३७३) दुचाकीला जोरदार धडक दिली. या अपघातात दोघांचा मृत्यू झाला असून दोन्ही दुचाकींचे नुकसान झाले आहे. याबाबत शाईराम बुधा चौधरी रा. वाकी यांनी पिंपळनेर पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, अपघातास कारणीभुत ठरल्याप्रकणी मयत संदिप ठाकरे यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोसई भुषण शेवाळे करीत आहेत.

### ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

धुळे शहरातील हजार खोली परिसरातील मदनी मशिदजवळ राहणाऱ्या सदाम हुसेन मुनाफ पिंजारी (वय ३५) यांचा भरधाव ट्रकच्या धडकेत मृत्यू झाला. मालेगाव ते कुसुंबा रोडवरील पारधी वस्तीच्या पुढे अजनाळे गावच्या वळणावर काल दि. १३ रोजी दुपारी चार वाजेच्या सुमारास ट्रकने (क्र.केए-५६-७८७७) दुचाकीला (क्र. एमएच-१८ बीक्यू-७९८७) जोराची धडक दिली. या अपघातात दुचाकीस्वार सदाम पिंजारी यांना गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी मन्सुरी अयमन जाकीर याने दिलेल्या फिर्यादीवरून धुळे तालुका पोलिसात ट्रक चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## केळी भाव

नवती (१) : 2500
नवती (२) : 2300




### राज ठाकरेंचा सावध पवित्रा, युतीबाबत सस्पेन्स वाढला

## विजयी मेळाव्याचा संबंध फक्त मराठीशी!

**नाशिक ।** राज्यात महापालिका निवडणुकीसाठी ठाकरे बंधू एकत्र येणार अशी चर्चा सुरू असतानाच राज ठाकरे यांनी एक मोठे वक्तव्य केले आहे. मुंबईतील मराठीचा विजयी मेळावा हा केवळ मराठीच्या मुद्द्यावर होता, विजयी मेळाव्याचा राजकारणाशी संबंध नाही असे राज ठाकरे म्हणाले. नोव्हेंबर-डिसेंबर दरम्यान युतीचे चित्र स्पष्ट होईल, त्यानंतर बघू असे राज ठाकरे म्हणाले. नाशिकमध्ये अनौपचारिक गप्पादरम्यान राज ठाकरे यांनी हे वक्तव्य केलं.



राज्यात महायुती सरकारने हिंदी सक्ती केल्यानंतर त्याच्या विरोधात दोन्ही ठाकरे बंधूंनी आवाज उठवला. त्यानंतर ही सक्ती मागे घेतली गेल्यानंतर दोन्ही ठाकरेंनी मुंबईत विजयी मेळावा घेतला. तब्बल २० वर्षांनी राज आणि उद्धव ठाकरे हे बंधू एकाच व्यासपीठावर आले. त्यामुळे आगामी पालिका निवडणुकीत हे दोन्ही बंधू एकत्र लढणार अशी चर्चा सुरू झाली.

आम्ही एकत्र आलो आहोत ते एकत्र राहण्यासाठीच असे वक्तव्य खुद्द उद्धव ठाकरे यांनी केले. जे महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल असेही ते म्हणाले होते. त्यामुळे मनसे आणि ठाकरेंच्या शिवसेनेची युतीची चर्चा झाल्याचे बोलले जाऊ लागले. दरम्यान, राज ठाकरे हे मात्र सावधगिरीने पावले टाकताना दिसले. आता त्यांचे ताजे वक्तव्य हे त्याला बळ देणारं असल्याची चर्चा आहे.

राज ठाकरे हे नाशिकमध्ये मनसेच्या तीन दिवसीय शिबिरासाठी दाखल झाले आहेत. त्यावेळी अनौपचारिक गप्पा मारताना ते म्हणाले की, मराठीचा विजयी मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, त्याचा राजकारणाशी संबंध नाही. नोव्हेंबर - डिसेंबर दरम्यान चित्र स्पष्ट होईल. त्यांनतर युती संदर्भातील निर्णय बघू असे ते म्हणाले.

### राज ठाकरेंविरोधात डीजीपींकडे तक्रार

त्रिभाषा धोरणावरून राज्यात बराच गदारोळ झाला होता. पहिलीपासून हिंदी शिकवण्याच्या निर्णयाला विरोध झाला होता. त्रिभाषा सूत्रीत हिंदी भाषाच्या सक्तीचा निर्णय सरकारने मागे घेतल्यानंतर राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र येऊन विजयी मेळावा घेतला. या मेळाव्यात राज ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यावरुन डीजीपींकेड तक्रार दाखल करण्यात आली आहे. राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी वरळी डोम येथे आयोजित केलेल्या मेळाव्यात भाषण केले. दरम्यान त्यांनी, मारहाण करतानाचा व्हिडीओ काढू नका असे म्हटले होते. या वक्तव्यावर अक्षेप घेत महाराष्ट्र डीजीपींकडे तक्रार दाखल करण्यात

## सर्वोच्च न्यायालयात न्याय होईल!

### उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केले मनोगत

**मुंबई ।** शिवसेना पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्हाच्या प्रकरणात ऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच एक समाधानकारक गोष्ट आहे. आमची शेवटची एक आशा आता सर्वोच्च न्यायालयच आहे. जिथे या चोरीच्या प्रकरणाचा न्याय निवाडा होईल, अशी प्रतिक्रिया शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोमवारी दिली.



शिवसेना पक्षाचे नाव आणि चिन्हाचे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असून या प्रकरणावर आता ऑगस्टमध्ये सुनावणी होणार आहे. यावर उद्धव ठाकरे यांनी आज प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, ऑगस्टमध्ये निकाल देणार असतील तर नक्कीच एक समाधानकारक गोष्ट आहे. कारण आमचे चिन्ह चोरले गेले आहे. मी नेहमी सांगतो, निवडणूक आयोगाला चिन्ह देण्याचा अधिकार आहे, परंतु पक्षाचे नाव बदलण्याचा अधिकार नाही. कोणाचं नाव उचलून दुसऱ्याला द्यायचे हा अधिकार निवडणूक आयोगाला नक्कीच नाही. त्यांना तो अधिकार असूच शकत नाही आणि आम्ही तो मान्यही करत नाही. निवडणूक चिन्हाबाबत म्हणाल तर ठीक आहे, आणि त्याबाबत देखील प्रकरण न्यायालयात आहे.

दरम्यान यावेळी बोलताना इंडिया आघाडीची बैठक झाली पाहिजे, असे देखील ते म्हणाले. लोकसभा निवडणुकीनंतर इंडिया आघाडीची बैठक झालेली नाही. मला वाटतं लवकरात लवकर बैठक झाली पाहिजे. बिहारमध्ये निवडणुका आहेत इतरही राज्यात निवडणुका आहेत. महाराष्ट्रात देखील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यामुळे बैठक तर झालीच पाहिजे, असेही उद्धव ठाकरे म्हणाले.

महापालिका निवडणूका एकदा जाहीर होवून जावू द्या मग युती आघाडीबाबत स्पष्ट भूमिका घेवू आज महाविकास आघाडीसोबत आम्ही आहोत. परंतू बऱ्याच दिवसांपासून मविआची एकत्र बैठक झाली नाही. त्यामुळे ही बैठक बोलविण्यात यावी अशीही मागणी त्यांनी यावेळी केली मनसे सोबतच्या युतीबाबत बोलतांना ठाकरे म्हणाले की, महायुती केवळ विरोधकांमध्ये फुट पाडण्याचा प्रयत्न करीत असून, भाजपानेतर फोडाफोडीचा ठेकाच घेतला आहे. मिंधे सेनेला आपल्या जवळ घेतल्यानंतर त्यांनी पवारांचेही घर फोडले. पण, ठाकरे मात्र त्यांच्या रणनितीला भूलले नाहीत. त्यामुळेच मनसे व शिवसेना कोणेत्याही निमित्ताने का होईला एकत्र आले. निवडणुका जाहीर झाल्यावर युतीबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.